# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### हिंगोली जिल्हयातील आदिवासी आश्रमशाळांची झालेली दुरावस्था

**(१) ५६२६ (१०-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात गोटेवाडी, जामगव्हाण, पिंपळदरी बोथी येथील आदिवासी आश्रमशाळा मोडकळीस आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी करुन सदर आश्रम शाळेच्या पुर्नविकासासाठी काय निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-०२-२०१७) :** (१) व (२) जामगव्हाण, पिंपळदरी व गोटेवाडी शासकीय आदिवासी आश्रमशाळांच्या इमारतींचे बांधकाम नवीन टाईप प्लॅन नुसार प्रगतीपथावर आहे. तर बोथी आश्रमशाळेचे बांधकाम पुर्ण झाले असून ताब्यात घेण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

### आदिवासी शाळामध्ये क्रिडाशिक्षक उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२) १०४६३ (०९-०४-२०१५). श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाच्या शाळांवर क्रिडा शिक्षक तसेच क्रिडा साहित्य देण्याबाबत शासनस्तरावर निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास उक्त निर्णय शासन घेणार आहे काय व त्याची अमंलबजावणी कधीपर्यंत करण्यात येणार आहे ?

**श्री. विष्णु सवरा (१०-०२-२०१७)** :(१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

शासकीय आश्रमशाळांच्या ठिकाणी क्रिडा शिक्षकांची पदे मंजूर नाहीत. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी क्रिडा साहित्य देण्याची तरतूद असून त्यानुसार आवश्यक असलेले क्रिडा साहित्य सन २०१२-१३ या वर्षात पुरविण्यात आलेले आहे.

आश्रमशाळा संहिता सुधारणेचे काम समितीमार्फत सुरु असून त्यामध्ये आवश्यकतेनुसार क्रिडा शिक्षकांबाबत शिफारस केल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.

शासकीय आश्रमशाळेत पुरविण्यात आलेले क्रिडा साहित्य पुढीलप्रमाणे:-

१) क्रिकेट संच
२) हॉलीबॉल सेट
३) डबलबार
४) सिंगलबार
५) घसरगुंडी मोठी
६) ढोल २८ इंची बेस ड्रम १
७) ढोल स्टिक जोडी
८) ढोल बेल्ट
९)थाप ढोल १७ इंची
१०) साईड ड्रम १४
११) स्टिक जोडी
१२) ट्रँगल १,
१३) बिगुल
१४) स्पोर्ट ढोल स्टँड
१५) बासरी
१६) हलगा

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महिला ओबीसी संघ जिल्हा शाखा भंडारा यांनी उर्जा मंत्र्यांना दिलेले निवेदन**

**(३) ११३४९ (०८-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी महिला ओबीसी संघ जिल्हा शाखा भंडारा यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन मा.ऊर्जा मंत्री यांचेकडे पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनातील मागण्यांचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, त्यापैकी किती मागण्यांनवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, वा घेण्यात येत आहे

(४) असल्यास, उर्वरित मागण्यांवर निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत त्यावर केव्हा निर्णय घेण्यात येणार आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (०७-०३-२०१७) :**(१) होय.

(२) व (३)

१. सदर निवेदनातील मागण्यांपैकी इतर मागासवर्गीयांसाठी असलेली भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेकरीता १०० टक्के निर्वाह भत्ता व ५० टक्के शिक्षण फी/परिक्षा फी ची प्रतिपूर्ती करण्यात येते.

२.नॉन क्रिमिलअरची अट रद्द करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

३. जिल्हास्तरावर नविन वसतिगृह सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

४. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती अनुसूचित जमाती निरधिसूचित जमाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ अन्वये विहीत करण्यात आलेली आहे. हा राज्यात दि.२९.१.२००४ अंमलात आला आहे. या अधिनियमातील कलम ४ (२) नुसार सरळसेवेने भरावयाच्या पदांकरीता इतर मागास प्रवर्गासाठी १९ टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. सदर अधिनियमातील कलम (२) १ नुसार आरक्षण अधिनियम २००१ संपूर्ण राज्यास लागू करण्यात आलेला आहे.

५. अनुसूचित जाती, विजाभज, विमाप्र मुलींसाठी लागू असलेली सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती इतर मागास प्रवर्गातील मुलींना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

६.विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राज्य पुरस्कृत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनांतर्गत पालकांच्या उत्पन्नांची मर्यादा रु.४.५० लाखावरुन ६.०० लाख करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी शहरातील शंकर नगर भागामधील संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांचे अनुदान बंद करण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(४) १३६६७ (०४-०४-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील शंकर नगर भागामधील जवळपास १० संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांचे अनुदान अचानक बंद करण्याचा निर्णय नुकताच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास नायब तहसिलदार यांनी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंद झालेले अनुदान तात्काळ देण्याबाबत सावता परिषदेच्या वतीने निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे दिले आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले त्यानुसार संबधितांनवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-०२-२०१७) :**(१) नाही.

(२) होय.

(३) व (४) निवेदनातील १० लाभार्थ्यांपैकी ०४ लाभार्थ्यांचे अनुदान सुरु आहे, उर्वरित ०५ लाभार्थ्यांचे अनुदान वार्षिक तपासणीमध्ये बंद पडल्याचे व एका लाभार्थ्यांचे अनुदान बायोमेट्रीक नोंदणीअभावी बंद असल्याचे आढळून आले आहे. ज्या लाभार्थ्यांचे अनुदान बंद आहे, त्यांनी विहीत नमुन्यातील अर्ज नव्याने भरुन दिल्यानंतर संबंधित समितीच्या मान्यतेनंतर नियमानुसार त्यांचे अनुदान सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

## गोंदिया जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळेत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्याबाबत

**(५) १५६९४ (१०-०४-२०१५). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळेमध्ये फक्त आदिवासी मुलांना प्रवेश देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर मागासवर्गीयाचा समावेश करण्यात यावा अशी शासनाकडे मागणी सातत्याने होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-०२-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि, आश्रमशाळा संहितेमधील तरतूदीनुसार अनुसूचित जमातीतेर विद्यार्थ्यांना बहिस्थ विद्यार्थी म्हणून आश्रमशाळेव्यतिरिक्त गावात किंवा आजूबाजूच्या गावात अन्य शाळा नाहीत. या शर्तीच्या अधिन राहून प्रवेश देता येतो.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्रीरामपूर (ता.जि.अहमदनगर) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीला शेती महामंडळाकडील जागा उपलब्ध करून देणेबाबत

**(६) २९९८४ (२२-१२-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (ता.जि.अहमदनगर) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचा अावाका वाढल्याने सद्यस्थितीत असलेली बाजार समितीची जागा कमी पडू लागली असल्याने या ठिकाणी शेती महामंडळाकडे उपलब्ध असलेली २५ एकर जागेची मागणी संबंधितांकडे करण्यात आली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभागात कृषी उत्पन्न बाजार समितीकडे जागेची कमतरता असल्याने शेतक-यांना आवश्यक सोयी सुविधा देण्याबाबत शासन आवश्यक कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-०३-२०१७) :** (१) जागेची मागणी केलेली आहे, हे खरे आहे.
(२) व (३) मागणी केलेली जागा अद्याप कृषी उत्पन्न बाजार समितीस मिळालेली नाही. याबाबतचा प्रस्ताव अंतिमत: महसूल विभागाने मान्य केल्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल.

---

### अनुसूचित जातीच्या नोकरदार महिलांसाठी व मुलींसाठी वसतीगृह बांधण्याबाबत

**(७) ३१००३ (१८-०१-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जातीच्या नोकरदार महिलांसाठी मुंबई, पुणे आणि नागपूर येथे वसतीगृह, तसेच मुलींसाठी ५० विद्यार्थी क्षमतेची तालुकास्तरीय ५० वसतीगृह बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावित केलेली वसतीगृहे कोणकोणत्या जिल्हयात सुरु करण्यात येणार आहेत,
(४) राज्यातील पुणे, मुंबई नवी मुंबई, ठाणे, नागपूर, औरंगाबाद या शहरामध्ये महिलांसाठी वर्किंग वुमन्स वसतिगृहे सुरु करण्यात येणार आहेत हे ही खरे आहे काय,
(५) अद्याप, निर्णय घेण्यात आला नसल्यास, उक्त प्रस्तावाचे स्वरुप काय आहे, त्यानुसार करावयाच्या कामांसाठी किती निधींची आवश्यकता आहे व सदर निधीची उपलब्धता कशाप्रकारे करण्यात येणार आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-०२-२०१७) :**(१), (२) व (३) होय.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षा निमित्ताने शासन निर्णय क्र.बीसीएच-२०१५/प्र.क्र.४११/बांधकामे, दि.१६/१२/२०१५ अन्वये राज्यामध्ये मागासवर्गीय मुलींना शिक्षण घेणे सोयीचे व्हावे म्हणून मुलींसाठी विभागीय स्तरावर ७ आणि जिल्हा व तालुकास्तरावर ४३ अशी एकूण ५० नवीन शासकीय वसतिगृहे सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.
(४) व (५) होय.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षा निमित्ताने शासन निर्णय क्र.सान्यावि-२०१५/प्र.क्र.९८/बांधकामे, दि.७/१/२०१६ अन्वये राज्यामध्ये शासकीय, निमशासकीय, खाजगी इत्यादी प्राधिकरणात नोकरी करणाऱ्या मागासवर्गीय महिलांकरिता मुंबई, पुणे व नागपूर येथे प्रत्येकी एक शासकीय वसतीगृह सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. वसतीगृहनिहाय प्रशासकीय मान्यतेच्या रकमेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

---

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील विद्यार्थ्यांना देय असलेली शिष्यवृत्ती, समाज कल्याण विभागाने सन २०१४-१५ या वर्षा पासून बंद केल्याबाबत**

**(८) ३५७९८ (१८-०१-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत Master of Science (Agri. Culuture Bio-Technology) या अभ्यासक्रमास प्रवेशीत OBC/SBC/VJNT विद्यार्थ्यांना देय असलेली शिष्यवृत्ती, समाज कल्याण विभागाने सन २०१४-१५ या वर्षा पासून बंद केली हे, खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील दापोली व राहुरी स्थित कृषी विद्यापीठात तत्सम अभ्यासक्रमास प्रवेशीत असलेल्या OBC/SBC/VJNT विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती मात्र सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी विद्यार्थी व विद्यापीठ प्रशासनाने, समाजकल्याण विभागाचे दृष्टीस सदर बाब आणून दिली, तथापी समाज कल्याण खात्याकडून मात्र कोणताही खुलासा करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती पासून वंचीत ठेवण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, सदर विद्यार्थ्यांची बंद केलेली शिष्यवृत्ती पूर्ववत सुरु करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही केली वा करत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (०९-०३-२०१७) :**(१) नाही.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत Master of Science (Agri.Culture Bio-Technology) या अभ्यासक्रमाचे सन २०१४-१५ या वर्षामध्ये Mapping झालेले नसल्याने सन २०१४-२०१५ वर्षामध्ये विद्यार्थ्यांना आवेदनपत्र ऑनलाईव्दारे भरता आलेले नाहीत. तथापि, सन २०१५-२०१६ या वर्षामध्ये सदर अभ्यासक्रमाचे Mapping करण्यात आलेले आहे.

(२) होय.

(३), (४) व (५) शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**नाशिक जिल्ह्यातील विविध महाविद्यालयात मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित ठेवल्याबाबत**

**(९) ३९३९८ (१८-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत नाशिक विभागातील विविध महाविद्यालयांनी तब्बल १ लाख ९३ हजार ७३५ मागासवर्गीय विद्यार्थ्याचे, महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज निकाली काढण्यासाठी सहायक आयुक्त समाजकल्याण कार्यालयाने हाती घेतलेली विशेष मोहिम पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, सदर मोहिमेअंतर्गत किती अर्ज निकाली काढले व किती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला,

(३) या प्रकरणी जबाबदार असणा-या संबंधित महाविद्यालयांच्या संस्थापक व प्राचार्यावर कोणती कारवाई केली आहे, तसेच कारवाई करण्यात आलेल्या महाविद्यालयांची नावे व ठिकाणे काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०९-०३-२०१७) :** (१) होय.

(२) सन २०१४-२०१५ वर्षाकरीता नाशिक विभागांतर्गत ३११६२७ अर्ज प्रलंबित होते. त्यापैकी २८०४०७ इतके अर्ज विशेष मोहिमेअंतर्गत निकाली काढले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील काच, पत्रा गोळा करण्याऱ्यांची मुले शिष्यवृत्तीपासून वंचित राहिली असल्याबाबत**

**(१०) ४२७१० (२८-०४-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऑनलाईन शिष्यवृत्ती प्रक्रियेतील गोंधळ आणि ही सुविधा घेणाऱ्या काच, पत्रा गोळा करणाऱ्या महिला संघटनांची अधिकृत नोंद जिल्हा परिषद प्रशासनाकडे नसल्यामुळे जिल्हयातील काच, पत्रा गोळा करण्याऱ्यांची मुले शिष्यवृत्तीपासून वंचित राहिली असल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील शिष्यवृत्ती मिळावी या मागणीसाठी काच, पत्रा गोळा करणाऱ्या महिलांनी जिल्हा परिषदेसमोर आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी तातडीने शिष्यवृत्ती मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०६-०३-२०१७) :**(१) नाही.
(२) होय.
(३) ज्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती विहित कागदपत्रा अभावी प्रलंबित आहे. त्या विद्यार्थ्यांकडून कागदपत्रांची पूर्तता शाळेमार्फत करुन शिष्यवृत्ती अदा करण्याची कार्यवाही जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचे कार्यालकयाकडून सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अनुसुचित जाती, जमाती व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमांसाठीची वार्षिक शिष्यवृत्ती मिळाली नसल्याबाबत**

**(११) ४३३१५ (२८-०४-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेष समाजकल्याण विभागामार्फत अनुसुचित जाती, जमाती व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमांसाठी वार्षिक शिष्यवृत्ती दिली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ ची शिष्यवृत्ती शैक्षणिक वर्ष सुरु होवून आठ महिने झाले तरी दिली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य स्तरावरील शैक्षणिक शुल्क समिती प्रत्येक महाविद्यालयाचे जे शैक्षणिक शुल्क निश्चित करते ते ही अद्याप निश्चित झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या विद्यार्थ्यांना तातडीने शिष्यवृत्ती देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०९-०३-२०१७) :**(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती, वि.जा.भ.ज. व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती दिली जाते, हे खरे आहे.
(२) नाही.
(३) नाही.

शैक्षणिक शुल्क समितीने सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षातील शुल्क निर्धारणाचे काम माहे ऑगस्ट २०१५ ते दिनांक १९ मार्च, २०१६ या कालावधीत केले. त्यानंतर दिनांक १९ मार्च, २०१६ रोजी शुल्क नियामक प्राधिकरण गठीत झाल्याने उर्वरित २०१ संस्थांचे शुल्क निर्धारणाचे राहिलेले काम प्राधिकरणाने जुलै २०१६ पर्यंत पुर्ण केले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कसारा (जि.ठाणे) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याचे मागणीबाबत**

**(१२) ४७८०८ (२८-०४-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसारा (जि.ठाणे) येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याची मागणी मा. सामाजिक न्याय मंत्री यांना शहापूरचे लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये व तत्पूर्वी अनेक निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने आत्तापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-०२-२०१७) :** (१) होय.

(२) श्री.रमाकांत पालवे यांनी शिल्पकार सामाजिक प्रबोधन संस्था स्थापन करुन सदर संस्थेमार्फत त्यांनी मौजे मोखावणे (कसारा), ता. शहापूर, जि. ठाणे येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय स्मारक किंवा सामाजिक भवन बांधण्याबाबत शासनाकडे निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, ठाणे यांचे कार्यालयातील प्रतिनिधीनी दि. २१/८/२०१४ रोजी भेट देऊन संस्थेची स्थळ पाहणी केली. तसेच संस्थेने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय स्मारक किंवा सामाजिक भवन बांधण्यासाठी सुचविलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेची पाहणी केली असता, सदर जागा अंदाजे ५० गुंठे आहे. परंतु प्रत्यक्षात त्या जागेवर सार्वजनिक बांधकाम विभागाचे क्वार्टर्स/गोडाऊन बांधलेले आहेत. सदरचा स्थळ पाहणी अहवाल दि.२६/८/२०१४ रोजी शासनास सादर करण्यात आला आहे.

मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांना मा.सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, ठाणे यांनी दि. २२/९/२०१५ पत्रान्वये डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय स्मारक किंवा सामाजिक भवन बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्वार्टर्स/गोडाऊन असलेली जागा स्मारक बांधण्यासाठी उपलब्ध करुन देता येईल किंवा कसे याबाबत विचारणा केली आहे. तसेच तहसिलदार, शहापूर यांना पत्र लिहून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेचा ७/१२ उतारा व फेरफार नक्कल मागविण्यात येत आहे. जागेचा ७/१२ व फरेफार प्राप्त झाल्यावर याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय स्मारक किंवा सामाजिक भवन बांधण्यासाठी शिल्पकार सामाजिक प्रबोधन संस्था, मोखावणे, (कसारा), ता.शहापूर, जि.ठाणे या संस्थेने कोणतीही जागा प्राप्त करुन घेतलेली नाही, तसेच अद्याप जागा प्राप्त झाली नाही. विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

___________

**मौजे सालेकसा (जि.गोंदिया) रमाई आवास योजनेंर्गत घरकुल मंजूर झाले असतानाही घरकुल न मिळाल्याबाबत**

**(१३) ४८११२ (३०-०४-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सालेकसा (ता.सालेकसा, जि.गोंदिया) अंतर्गत हलबीटोला येथील श्री.अमृत डोंगरे हे दारिद्रयरेषेखाली असून ते अनुसूचित जातीचे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्या नावावर रमाईआवास योजनेंतर्गत २००२ मध्ये घरकुल मंजूर झाले असून घरकुलांचे काम पूर्ण झाल्याचे ग्रामपंचायताच्या रेकॉर्डवर आहे परंतु प्रत्यक्षात मात्र डोंगरे यांना अद्यापपर्यंत घरकुल मिळाले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-०२-२०१७) :**(१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

रमाई आवास योजना ही शासन निर्णय दि. १५/११/२००८ अन्वये कार्यान्वीत करण्यात आली असून, २००२ मध्ये श्री. अमृत मेहतर डोंगरे यांना रमाई आवास योजनेचा लाभ देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) होय,

श्री. अमृत मेहतर डोंगरे, यांना सन १९९७-९८ मध्ये इंदिरा आवास योजनेंतर्गत घरकुल मंजूर करण्यात येऊन सन २००० मध्ये घरकुलाचे काम पूर्ण झाल्याबाबतचे पंचायत समिती सालेकसा यांचेकडे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध असल्याचे चौकशीत आढळून आले. तसेच श्री.अमृत डोंगरे हे घरकुलात राहात नसल्याचे चौकशीत दिसून आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत खाजगी नर्सिंग स्कूल जीएनएम व एएनएम अभ्यासक्रमांमधील प्रशिक्षणार्थींना सुधारित दराने शिष्यवृत्ती देणेबाबत**

**(१४) ५२३०७ (२८-०४-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत खाजगी नर्सिंग स्कूल जीएनएम व एएनएम अभ्यासक्रमांमधील प्रशिक्षणार्थींना शिष्यवृत्तीबाबत केंद्र शासनाने सामाजिक न्याय व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दिनांक १ जुलै, २०११ पासून गट अ ते गट ड अभ्यास गटांना सुधारित दराने शिष्यवृत्ती मंजूर केली असून उत्पन्न मर्यादा रु.१.०० लाख इतकी करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परंतु राज्य शासनाने अद्याप सुधारित अभ्यासक्रम गट व सुधारीत दरास मान्यता दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापपर्यंत मान्यता न देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०९-०३-२०१७) :**(१) होय.

इतर मागासवर्गीयांसाठी असलेल्या केंद्र पुरस्कृत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेमध्ये दिनांक ११ ऑगस्ट, २०११ च्या पत्रान्वये केंद्र शासनाने अभ्यासक्रम, उत्पन्न मर्यादा व निर्वाह भत्तात सुधारणा केलेली आहे. यामध्ये एएनएम व जीएनएम अभ्यासक्रमासहीत अन्य अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात आला आहे.

शासन निर्णय दिनांक २१ जानेवारी, २००८ अन्वये इतर मागासवर्गीसाठी असलेल्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेतर्गत विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्न मर्यादा रु.१,००,०००/- करण्यात आली आहे.

(२) होय.

(३) इतर मागावर्गीसाठी असलेल्या मॅट्रोकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सुधारीत अभ्यासक्रम व निर्वाह भत्तामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे.

---

**मराठवाड्यातील राष्ट्रीयकृत बँका व सहकारी बँका दुष्काळग्रस्त शेतक-यांना खरीप हंगामासाठी दिलेले अल्प मुदतीचे कर्जाचे रुपांतर दिर्घ मुदतीच्या कर्जात करीत असल्याबाबत**

**(१५) ५२६८० (२७-०४-२०१६). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील राष्ट्रीयकृत बँका व सहकारी बँका दुष्काळग्रस्त शेतक-यांना खरीप हंगामासाठी दिलेले अल्प मुदतीचे कर्जाचे रुपांतर दिर्घ मुदतीच्या कर्जात करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अल्प मुदतीच्या कर्जाचे रुपांतर दिर्घ मुदतीत केल्यास व्याजदर ६% वरुन १२% वर जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील निर्णयाबाबत शेतकऱ्यांची संमती घेतली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात औरंगाबाद विभागीय महसूल आयुक्त यांनी शासनाकडे अहवाल पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, या बाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१५-०२-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व्यापारी बँका व ग्रामीण बँकामार्फत सन २०१५ च्या खरीप हंगामातील ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावातील शेतकऱ्यांकडील अल्पमुदत पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात (कालावधी ५ वर्षे) रुपांतर (पुनर्गठन) करण्यात येत आहे.

(२) होय, हे खरे आहे. तथापि,

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र.पीककर्ज ३१६/प्र.क्र.७९/२-स, दिनांक ९/५/२०१६ मध्ये सन २०१५-१६ या वर्षातील खरीप २०१५ या हंगामातील शासनाने ५० पैसपेक्षा कमी पैसेवारी जाहीर केलेल्या गावातील शेतक-यांच्या पीक कर्जाचे दिनांक २९/७/२०१५ च्या शासन निर्णयाच्या धर्तीवर पुनर्गठन करण्यात येऊन या कर्जावरील प्रथम वर्षाचे संपूर्ण व्याज व व्दितीय वर्षापासून पुढील ४ वर्षाचे (सन २०१७-१८ ते २०२०-२१) ६% दराने होणारे व्याज शेतक-यांच्या वतीने शासनामार्फत बँकांना अदा करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

(३) नाही. औरंगाबाद व लातूर विभागातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका व ग्रामीण बँका शेतक-यांची संमती घेऊन खरीप-२०१५ मध्ये वाटप केलेल्या पीक कर्जाचे पुनर्गठन केले आहे.

(४) यासंदर्भातील अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्थेच्या कार्यालयाने केलेल्या सर्वेक्षणामध्ये रायगड जिल्ह्यातील ४७९ सहकारी पतसंस्थापैकी ३८ सहकारी पतसंस्था डबघाईस आल्याबाबत

**(१६) ५३६८९ (२२-०८-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्थेच्या कार्यालयाने केलेल्या सर्वेक्षणामध्ये रायगड जिल्ह्यातील ४७९ सहकारी पतसंस्थापैकी ३८ सहकारी पतसंस्था डबघाईस आल्याचे माहे एप्रिल, २०१६ च्या मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पतसंस्थांची नावे काय आहेत,

(३) असल्यास, यामुळे या पतसंस्थेतील ठेवीदारांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-०३-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) अलीबाग तालुक्यातील पतसंस्था

१)श्री.गणेशकृपा ग्रा.बि.शेती सह.पत.मर्या.,थळ

२)श्रीराम ग्रा.बि. शेती सह.पत. मर्या., चिंचोटी

३)दत्तप्रभा ग्रा.बि.शेती सह. पत. मर्या., वाघ्रण

४)साईकृपा ग्रा.बि. शेती सह. पत. मर्या., थळ

पेण तालुक्यातील पतसंस्था-

५) जनकल्याण ग्रा.बि.शेती सह. पत. मर्या., तरणखोप

६) श्री जनार्दन ग्रा.बि. शेती सह. पत. मर्या., बोरी

७) श्री वैजनाथ ग्रा.बि.शेती सह.पत.मर्या., पेण

८) श्री समर्थ ग्रा.बि. शेती सह. पत. मर्या., पेण

पनवेल तालुक्यातील पतसंस्था-

९) सेवा सुर्या ग्रा.बि. शेती सह. पत. मर्या., पनवेल

१०) जनकल्याण नागरी सह. पत. मर्या., पनवेल

११) राज को. ऑप. क्रेडीट सोसा. लि., पनवेल

१२) शिवसिंधु नागरी सह. पत मार्या., पनवेल

१३) हिंदुस्थान नागरी सह. पत. मर्या., पनवेल

१४) शिवसागर नागरी सह. पत. मर्या., कामोठे

१५) स्वयंसिध्दा नागरी सह.पत.मर्या., पनवेल

कर्जत तालुक्यातील पतसंस्था-

१६) समात नागरी सह. पत.मर्या., कर्जत

१७) श्री महालक्ष्मी महिला ग्रा.बि. शेती सह.पत.मर्या.,भिसेगाव

१८) शिवाई ग्रा.बि. शेती सह.पत मर्या., नेरळ

रोहा तालुक्यातील पतसंस्था-

१९) रोहा नागरी सह.पत.मर्या., रोहा

पोलादपूर तालुक्यातील पतसंस्था-

२०) कांगोरीगड ग्रा.बि. शेतीसह.पत.मर्या., पोलादपूर

महाड तालुक्यातील पतसंस्था-

२१) जयंत नागरी सह.पत.मर्या., महाड

उरण तालुक्यातील पतसंस्था-

२२) वरदविनायक पतसंस्था मर्या., उरण

२३) शिवसमर्थ ग्रा.बि.शेती सह. पत.मर्या., आवरे

२४) प्रियदर्शनी ग्रा.बि.शेती सह.पत.मर्या., विंधणे

२५) करंजा कोळी ग्रा.बि.शेती सह.पत.मर्या., करंजा

खालापूर तालुक्यातील पतसंस्था-

२६) श्री स्वीमी समर्थ ग्रा.बि.शेती सह.पत.मर्या., खालापूर

२७) वैभवलक्ष्मी नागरी सह.पत.मर्या., खोपोली
सुधागड तालुक्यातील पतसंस्था-
२८) प्रबोधनकार ग्रा.बि. शेती सह.पत. मर्या., पाली
२९) बल्लाळेश्वर ग्रा.बि. शेती सह. पत.मर्या., गोमती
३०) पंचशिला ग्रा.बि. शेती सह. पत.मर्या., पाली
३१) समर्थ ग्रा.बि. शेती सह.पत.मर्या., परळी
३२) समाधान ग्रा.बि. शेती सह.पत.मर्या., पाली
माणगाव तालुक्यातील पतसंस्था-
३३) अल्फताह नागरी सह.पत.मर्या., मोर्बा
३४) धनलक्ष्मी ग्रा.बि. शेती सह. पत.मर्या., कोशिंबळे
३५) भाग्योदय ग्रा.बि. शेती सह. पत.मर्या., उतेखोल
३६) दत्त दिगंबर ग्रा.बि. शेती सह.पत.मर्या., पाटणूस
३७) इंदापूर ग्रा.बि. शेती सह.पत. मर्या., इंदापूर
३८) हिरकणी महिला ग्रा.बि. शेती सह.पत.मर्या., उतेखोल

(३) व (४) उपरोक्त ३८ पतसंस्था सर्वेक्षणात बंद असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे या पतसंस्थांवर अवसायकांच्या नेमणूका करण्यात आल्या असून अवसायनाची प्रक्रिया सुरु आहे. तसेच या संस्थांच्या ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासाठी प्राधान्याने कार्यवाही करणेबाबत संबंधीत अवसायकांना जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड अलिबाग यांचेकडून सूचित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यामध्ये मागासवर्गीय समाजातील मुलामुलींसाठी संस्थेमार्फत चालवण्यात येणारे वसतिगृह अनेक ठिकाणी बंद असल्याबाबत**

**(१७) ५३८४५ (२०-०८-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये मागासवर्गीय समाजातील मुलामुलींसाठी संस्थेमार्फत चालवण्यात येणारे वसतिगृह अनेक ठिकाणी बंद असल्याने मुलामुलींना वसतिगृह प्रवेशापासून वंचित राहावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बंद पडलेली अनुदानित वसतिगृह चालविण्यासाठी अनेक संस्थांचे मागणी प्रस्ताव मंत्रालय व समाजकल्याण आयुक्तालय स्तरावर प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरच्या हस्तांतरण प्रक्रियाबाबत शासनाचे धोरण स्पष्ट नसल्याने अनेक प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्यासाठी व हस्तांतरण प्रक्रिया वेगवान करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करत आहे,

(५) असल्यास, धोरण स्पष्ट नसल्याचे काय कारणे आहेत,
(६) तसेच प्रलंबित प्रकरणे कधीपर्यंत मार्गी लावण्यात येणार आहेत,
(७) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-०२-२०१७) :**(१) नाही.
(२) व (३) नाही.

सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत असलेल्या अनुदानित वसतिगृहांपैकी बंद असलेली अनुदानित वसतिगृहांपैकी बंद असलेली वसतिगृहे हस्तांतरीत व स्थलांतरीत करुन मिळणेबाबत स्वयंसेवी संस्थांनी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचेमार्फत शासनास वेळोवळी सादर केलेले व शासन स्तरावर प्रलंबित असलेले दि.१/१०/२०१४ पर्यंतचे प्रस्ताव शासन परिपत्रक दि.३१/१०/२०१४ अन्वये रद्द करण्यात आले आहेत.
(४) व (५) बंद असलेली अनुदानित वसतिगृहे हस्तांतरण व स्थलांतरणाबाबत नव्याने धोरण ठरविण्याची प्रक्रिया शासन स्तरावर सुरु आहे.
(६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात भाज्यांचे भाव वाढले असल्याबाबत**

**(१८) ५४४४० (२२-०८-२०१६). श्री.अमित देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कमी उत्पादन आणि अपुरा पुरवठा यामुळे टोमॅटो, भेंडी, मिरची यांसारख्या फळभाज्यांच्या मुंबई व नवी मुंबईतील घाऊक बाजारातील किमतीत सुमारे १० ते १२ रुपयांची वाढ झाल्याचे माहे मे, २०१६, मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पणन विभागाच्या सहाय्याने भाजीविक्री केंद्रे सुरु करण्याची राज्यसरकारची योजना ही कागदावरच असून याबाबत शासनाकडून कोणतेही स्पष्टीकरण आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डाळ, फळभाज्यांच्या किमतीत मोठ्या प्रमाणावर वाढल्याने घाऊक आणि किरकोळ बाजारातील विक्रेते, सर्वसामान्य जनता व गृहिणीं सर्वच त्रस्त असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-०३-२०१७) :** (१) मान्सूनचे उशीरा आगमन झाल्यामुळे भाजीपाला व फळभाज्याच्या उत्पादनात घट झालेली होती. त्यामुळे बाजारात आवक कमी झाल्याने भाजीपाला व फळभाज्याचे दर वाढलेले होते.
(२) व (३) नाही. तथापि, ज्या भागात भाजीपाला व फळभाज्याचे उत्पादन चांगले झाले होते, अशा भागातून इतरत्र भाजीपाला व फळभाज्या पाठविण्याची व्यवस्था FPO (Farmer Producers Organization) च्या माध्यमातून केल्याने बाजारात पुरवठा सुरळीत होण्यास मदत झाली आहे. तसेच ग्राहकांना थेट शेतकऱ्यांमार्फत ताजा भाजीपाला फळभाज्या व फळे

वाजवी दरात उपलब्ध व्हावीत यासाठी “श्री.संत शिरोमणी श्री.सावता माळी शेतकरी आठवडे बाजार योजना” शासनाने सुरु केली असून याअंतर्गत सद्यस्थितीत प्रामुख्याने नागरी भागात महानगरपालिका/शासकीय कार्यालयातील व गृहनिर्माण संस्थेच्या उपलब्ध मोकळया जागेत ९२ आठवडे बाजार सुरु झालेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्ह्यात संजय गांधी निराधार व श्रावण बाळ योजनेंतर्गत लाभार्थींना आर्थिक मदत मिळालेली नसल्याबाबत**

**(१९) ५५३१८ (२०-०८-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्ह्यात संजय गांधी निराधार व श्रावण बाळ योजनेंतर्गत लाभार्थींना मागील तीन महिन्यापासून आर्थिक मदत मिळालेली नसल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्येक लाभार्थ्यांला ६०० रुपये प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला त्यांच्या खात्यात जमा करायचे असा नियम आहे. परंतु या नियमाकडे बुलडाणा जिल्ह्यात दूर्लक्ष करण्यात येत असल्याने वयोवृध्द निराधार महिला व पुरुषांची गैरसोय होत असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१०-०३-२०१७) :**(१) नाही.
(२) सदर योजनांच्या लाभार्थ्यांना दरमहा अनुदान वितरीत करण्यात येत आहे. तसेच लाभार्थ्यांच्या सदर अनुदानाची रक्कम दरमहा थेट त्यांच्या खात्यात जमा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उंद्री (ता. चिखली, जि.बुलढाणा) येथील रमाई घरकुल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची यादी अद्याप पूर्ण झाली नसल्याबाबत**

**(२०) ५५३३४ (२०-०८-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंद्री (ता. चिखली, जि.बुलढाणा) येथील रमाई घरकुल योजनेअंतर्गत १०७ लाभार्थ्यांची यादी ग्रामपंचायतीने नोटीस बोर्डावर लावून अंदाजे ५ वर्षे झाले तरी ती यादी अद्याप पूर्ण झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जगेची नोंद ८ अ वर घेऊन तात्काळ रमाई घरकुलाचा प्रस्ताव संबंधित अधिकारी यांचेकडे पाठविण्यात येऊन तसे आदेश ग्रामपंचायतीला देऊन रमाई घरकुलाची यादी पूर्णत्वास न्यावी, अशी मागणी उंद्रीतील लाभार्थ्यांनी मा. जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-०२-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) उंद्री, ता.चिखली, जि.बुलढाणा येथील सन २012 मधील रमाई आवास योजनेतील प्रतिक्षा यादीतील लाभार्थ्यांची संख्या ही १०७ होती. यातील एक नाव दुबार असल्याने ते कमी करण्यात आले. तसेच सन २०१४ च्या पुरवणी यादीमधील १५ लाभार्थ्यांच्या नावांचा नव्याने समावेश करण्यात आला. अशा प्रकारे मूळ प्रतिक्षा यादीतील १०६ व पुरवणी यादीतील १५ अशी एकूण १२१ लाभार्थ्यांची प्रतिक्षा यादी ग्रामपंचायत, उंद्री, चिखली, जि.बुलढाणा यांनी तयार केली आहे. त्यापैकी ५० लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात आला आहे. ३० अतिक्रमण लाभार्थी धारकांच्या जागा नियमित करणेबाबतचा प्रस्ताव तहसिल कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे. ३४ लाभार्थी विविध कारणामुळे (पक्के घर, शासकीय नोकरी, निवृत्तीवेतन धारक, जागा उपलब्ध नसणे, वारसा नसणे वा वारसाचे प्रमाणपत्र नसणे इ.) अपात्र ठरले आहेत. उर्वरित ७ लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे सादर न केल्याने त्यांना घरकुलाचा लाभ देता आलेला नाही.

---

## पुणे जिल्हयातील शिरुर तालुक्यातील निराधारांना संजय गांधी योजनेचे अनुदान मिळाले नसल्याबाबत

**(२१) ५६३४६ (२०-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील शिरुर तालुक्यातील निराधारांना आधार देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या संजय गांधी योजनेचे अनुदान लाभार्थ्यांना मागील सहा महिन्यापासून देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे अनुदान दरमहा वेळेवर लाभार्थ्यांना मिळत नसल्याने वृध्द व निराधार लोकांना त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संजय गांधी निराधार योजना अनुदान प्रती महा २००० रु. करण्याबाबत शासनाकडे मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निराधार व वृध्दापकाळ योजनेचे अनुदान वाढवून दर महा लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-०२-२०१७)** :(१) होय.

(२) होय. शिरुर तालुक्यातील विशेष सहाय्य कार्यक्रमातील लाभार्थ्यांना काही तांत्रिक अडचणीमुळे अनुदानाचे वाटप वेळेवर करता आले नाही. परंतु, सद्यस्थितीत ऑगस्ट, २०१६ अखेरपर्यंतचे अनुदान वाटप करण्यात आले आहे.

(३) होय. अनुदानाच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत मागणी होत आहे.

(४) विशेष सहाय्य कार्यक्रमातील लाभार्थ्यांच्या निवृत्तीवेतनाची रक्कम दरमाह त्यांच्या खात्यात जमा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**हिंगोली जिल्हयातील शेतकऱ्यांना पेरणीच्या तोंडावर पिक कर्ज पुर्नगठणाचा लाभ मिळणार नसल्याबाबत**

**(२२) ५६५०४ (२२-०८-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या वतीने पिक कर्ज पुर्नगठणासाठी मुदतवाढ दिली असून ३१ जुलैपर्यंत सर्व बँकांनी पिक कर्ज वसूलीस स्थगिती देऊन पुर्नगठण करण्याचे आदेश दिले आहेत त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना पेरणीच्या काळात पिक कर्ज पुर्नगठणाचा लाभ मिळणार नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली जिल्हयातील वसमतमध्ये कर्जाचे पुनर्गठन करण्यात बँकेचे अधिकारी नकार देत असल्याने त्रस्त झालेल्या राजोना गावातील शेतकऱ्यांनी दिनांक २ जून, २०१६ रोजी सामुदायिक आत्मदहन करणार असल्याचे मा.जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना पिक कर्ज मिळावे यासाठी शासनाने पिक कर्ज पुर्नगठणास अधिक मुदतवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच पिककर्ज प्रक्रिया सुलभ करुन येथील शेतकऱ्यांना पीककर्ज बँकाकडून तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१०-०२-२०१७)** :(१) नाही.

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या शासन शुध्दीपत्रक दिनांक २० मे, २०१६ अन्वये खरीप पीक कर्जाच्या पुनर्गठणाची कार्यवाही दिनांक ३१/०७/२०१६ पर्यंत करण्याच्या सुचना सर्व बँकांना दिल्या आहेत. त्यामुळे पात्र सभासदांना पीक कर्ज पुनर्गठणाचा लाभ देण्यात आला आहे.

(२) हिंगोली जिल्हयात वसमत तालुक्यातील राजोना येथील शेतक-यांचे कर्जाचे पुनर्गठन करण्यास बँकेचे अधिकारी नकार देत असल्याची कोणतीही तक्रार नाही. तथापि, रिधोरा ता. वसमत या गावातील २७ शेतक-यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा हट्टाचे अधिकारी कर्जाचे पुनर्गठण करीत नसल्याबाबत दिनांक ०२/०६/२०१६ रोजी सामूहिक आत्मदहन करीत असल्याबाबत मा.जिल्हाधिकारी, हिंगोली यांना दिनांक २८/०५/२०१६ रोजी निवेदन दिले आहे.

(३) पिक कर्ज पुनर्गठणास दिनांक ३१/०७/२०१६ नंतर मुदतवाढ देण्यात आलेली नाही.
(४) हिंगोली जिल्ह्यात वसमत तालुक्यातील महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा-हट्टा यांचेकडे रिधोरा गावातील ज्या २७ शेतक-यांनी निवेदन दिले. त्यापैकी ५ शेतक-यांनी बँकेची मागाील कर्ज बाकी भरणा करुन कर्जाचे नुतनीकरण करुन घेतले आहे. तसेच १६ शेतक-यांनी पुनर्गठणासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यामुळे त्यांच्या कर्जाचे पुनर्गठण करण्यात आले आहे. उर्वरीत ६ शेतक-यांनी ७/१२ , होल्डींग, आधारकार्ड इ. कागदपत्रे बँकेकडे दाखल केली नसल्यामुळे त्यांच्या कर्जाचे पुनर्गठण झाले नाही.
(५) महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा-हट्टा यांचेकडे माहे मे, २०१६ चे सुमारास पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने विलंब झाल्याचे बँकांनी दिनांक १३/०७/२०१६ रोजीच्या पत्राने कळविले आहे.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभार समाजाच्या मागण्याबाबत

**(२३) ५७०३२ (१९-०८-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभार समाजाच्या मागण्याबाबत कुंभार समाजाच्या वतीने माहे फेब्रुवारी, २०१६ रोजी च्या दुस-या सप्ताहात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाचे आयोजन करुन त्यांच्या मागण्यांचे निवेदन सहाय्यक जिल्हाधिकारी यांना दिले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागण्याचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, निवेदनातील काही मागण्या मान्य करण्यात आल्या असून उर्वरित मागण्यावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०२-०३-२०१७) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर विभागातील जातपडताळणीसाठी कार्यालय उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२४) ५७२३८ (२०-०८-२०१६). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर विभागातील जातपडताळणीसाठी शासनाने अद्‌याप कार्यालय उपलब्ध करुन न दिल्यामुळे जातपडताळणीच्या दाखल्यासाठी नागरिकांना तसेच विद्‌यार्थ्यांना विभागीय कार्यालयात वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जातपडताळणीसाठी जागा उपलब्ध करुन न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, जातपडताळणीसाठी कार्यालय उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-०२-२०१७) :** (१) दि. २१ नोव्हेंबर, २०१६ पासून जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांचे दैनंदिन कामकाज सुरु झालेले असून कोल्हापूर विभागातील समित्यांकरिता कार्यालये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वडांगळी (ता.सिन्नर,जि.नाशिक) बाजार तळावरील आठवडे बाजाराचे महाराष्ट्र स्पर्धात्मक कृषी पणन (आत्मा) अंतर्गत सुरु असलेले सुशोभिकरण व नुतनीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(२५) ५७६९१ (२३-०८-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडांगळी ता. सिन्नर (जि.नाशिक) बाजार तळावरील आठवडे बाजाराचे महाराष्ट्र स्पर्धात्मक कृषी पणन (आत्मा) अंतर्गत सुरु असलेले सुशोभिकरण व नुतनीकरणाचे काम निकृष्ट दर्जाची होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम निकृष्ट दर्जाचे होत असून वेळोवेळी स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाकडे/तालुका कृषी अधिकारी लेखी व तोंडी तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१८-०२-२०१७) :** (१) व (२) नाही.
आठवडी बाजार वडांगळी (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील कामासंदर्भात कुठलीही तक्रार प्रकल्प स्तरावर प्राप्त झालेली नाही.
(३) कामासंदर्भात कुठलीही तक्रार प्रकल्प स्तरावर प्राप्त झालेली नाही. तथापी प्रकल्पाचे बाजारक्षेत्र अभियंता यांचेकडून या प्रश्नामुळे चौकशी अहवाल व गुणवत्ता परीक्षण अहवाल मागविण्यात आला होता. सदर अहवालात कामाची गुणवत्ता उत्तम असल्याचे नमूद केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यातील गेवराई तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या रस्त्याच्या कामातील गैरव्यवहाराबाबत**

**(२६) ५७७३९ (२२-०८-२०१६). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील गेवराई तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जुन्या मार्केट यार्ड येथे सध्या रस्त्याचे काम सुरु असून ते अंदाजपत्रकानुसार न करता वरवरचे काम करुन यामध्ये कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-०३-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई एअर पोर्ट एम्प्लॉईज को. ऑ. क्रेडिट सोसायटी मर्या.मधील गैरव्यवहाराबाबत**

**(२७) ५७८१८ (२२-०८-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई एअर पोर्ट एम्प्लॉईज को. ऑ. क्रेडिट सोसायटी मर्या. चे चेअरमन असून सोसायटीच्या स्थापनेपासून म्हणजे सन २००७ पासून अद्यापपर्यंत सोसायटीमध्ये निवडणूक घेण्यात आली नाही, सन २००८-२०१५ या कालावधीत सोसायटीकडून सभासदांना वितरित केलेल्या कर्जाचा तपशील सोसायटीकडे उपलब्ध नाही, सोसायटीचे स्वयंघोषित चेअरमन सोसायटीकडील पैसा स्वत:साठी गुंतवणूक करुन स्वत:चे उद्योग करित आहेत, सोसायटीचे ऑडीट होत नाही, सोसायटीच्या वार्षिक व मासिक सभेच्या ठरावाच्या प्रती सोसायटीकडे उपलब्ध नाहीत अशाप्रकारे उक्त सोसायटीमध्ये चेअरमन मनमानी करुन प्रचंड गैरव्यवहार करित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सोसायटीच्या चेअरमनकडून होत असलेल्या गैरव्यवहाराबाबत सोसायटीचे सचिव श्री.मोहम्मद सरवर यांनी सहाय्यक निबंधकांकडे तक्रार केली होती व त्याअनुषंगाने सहाय्यक निबंधकांकडून सोसायटीच्या कारभाराचे पर्यवेक्षण करण्यासाठी पर्यवेक्षक नेमण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोसायटीच्या चेअरमनने सहाय्यक निबंधकांवर दडपण आणून शासकीय कार्यवाहीस स्थागिती आणून स्वत:चा मनमानी कारभार अद्यापही पुढे चालू ठेवल्याने सोसायटीचे कर्मचारी व सभासद यांच्यामध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबतीत चौकशी करुन सोसायटीचे चेअरमन व त्यांना पाठीशी घालणाऱ्या अन्य व्यक्तींविरुध्द शासनाने काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-०३-२०१७) :**(१) मुंबई एअर पोर्ट एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडीट सोसायटी मर्या.या संस्थेच्या समिती सदस्यांविरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एच/पूर्व विभाग यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ अन्वये दिनांक २२.०९.२०१६ रोजी चौकशीचे आदेश पारीत केले असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(२) व (३) सोसायटीमधील गैरव्यवहाराबाबत संस्थेचे तत्कालीन सचिव श्री.मोहम्मद सरवर यांनी केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एच/पूर्व विभाग यांनी दिनांक ४.३.२०१६ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राधिकृत अधिकारी म्हणून श्री. सेनगावकर, लेखापरिक्षक यांची नेमणूक केली असून निवडणूक प्रक्रीया पार पाडण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औद्योगिक सहकारी वसाहत लातूर येथे उद्योग संचालनालयाच्या मालकीच्या भुखंडावर अनधिकृतपणे इमारत बांधण्यात आल्याबाबत**

**(२८) ५७८६४ (२२-०८-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औद्योगिक सहकारी वसाहत लातूर येथे उद्योग संचालनालयाच्या मालकीच्या भूखंडावर अनधिकृतपणे लातूर अर्बन बँकेची इमारत तसेच भव्य शॉपिंग सेंटर व इमारती बांधून प्लॅटसची विक्री केली आहे व महापालिकेत स्वत:ची मालमत्ता म्हणून नोंद केली आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात पुराव्यांसह जिल्हाधिकारी, लातूर यांचेकडे दि.१४/०५/२०१५ रोजी व त्यानंतरही सातत्याने तक्रारी दाखल झाल्या आहेत काय,
(३) असल्यास, लातूर औद्योगिक सहकारी संस्थेची वसाहत आणि लातूर अर्बन बँकेचे अध्यक्ष एकच व्यक्ती असल्याने याबाबतीत संस्थेची फसवणूक केल्याप्रकरणी दि.२४/४/२०१५ रोजी आयुक्त महापालिका-लातूर यांचेकडे तक्रार दाखल झाली आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सरकारी भुखंडावर स्वत:ची खाजगी मालमत्ता म्हणून फेरबदल करणाऱ्या व्यक्तीविरोधात व फेरफार करण्यास सहकार्य करणाऱ्या व तक्रारीनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-०३-२०१७) :** (१) होय.

लातूर अर्बन बँक ही सहकारी औद्योगिक वसाहतीच्या कार्यालयाच्या जागी नोंद आहे. शॉपींग सेंटर हे वसाहतीच्या जागी बांधलेले आहे. तसेच इतर इमारती ह्या ही वेगवेगळ्या नावे नोंदविले आहे ह्या सर्व नोंदी महानगर पालिकामध्ये आहे.

(२) व (३) होय.

(४) सदर सरकारी भुखंडावर स्वतःची खाजगी मालमत्ता म्हणून फेरबदल करणा-या व्यक्ती विरोधात व फेरफार करण्यास सहकार्य करणा-या व तक्रारी अनुषंगाने आतापर्यंत खालील प्रमाणे कार्यवाही केली :-

१. महानगर पालिका ने सदर मालमत्तेच्या नोंदी घेताना उद्योग संचालनालय व सहाय्यक निबंधकांच्या परवानगीची खातरजमा केली नाही.

२. तसेच महानगर पालिका लातूरने सदर नोंदी रद्द करता कायम ठेवल्या आहेत.

३. सदर औद्योगिक वसाहतीमध्ये काही प्लॉट धारकाच्या मालमत्तेच्या नोंदी घेवून बांधकाम करण्यास परवानगी दिलेली आहे.

४. सहकारी निबंधक लातूर यांनी औद्योगिक वसाहतीची चौकशी केली व सदर संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले व तसेच त्या ठिकाणी प्रशासक नेमण्यात आले.

५. सहकारी निबंधकांनी केलेल्या चौकशीच्या अहवालात खालील प्रमाणे त्रुटी/अनियमितता आढळून आल्या.

कार्यालयाच्या आदेशाची पायमल्ली/सुचनाचे उल्लघंन, अनुपालन न करणे अनधिकृतरित्या प्लॉट वरील वास्तव्य बाबत संस्थेच्या उपविधीतील तरतूदीशी विसंगत, कार्यालयीन स्तरावर कार्यवाही करणेबाबत उद्योग संचालनालाकडील निर्देश, बेकायदेशीरित्या एकापेक्षा जास्त भूखंड एकत्रीत करणे, दवाखाने व इतर व्यवसाय सुरु करणे, टोलेजंग इमारतीची उभारणी यामुळे भाडेकरारातील निकषांचे पालन करण्यास संस्था अपयशी ठरलेली आहे.

६. सबब, संस्था कारवाईस पात्र ठरत असल्याने, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनीयम १९६० कलम ७८(अ) (१) अन्वये सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, लातूर यांनी जा.क्र./कारणे दाखवा नोटीस/लाओवला/२०१५/३६२३, दि. १३/३/२०१५ अन्वये कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे.

७. जिल्हा उद्योग केंद्राने संस्थेला प्लॉट हस्तांतरण किंवा देवाणघेवाण इत्यादी व्यवहार उद्योग संचालनालयाची परवानगी न घेता करु नये असे वेळोवेळी कळविले आहे.

८.शासनाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्यामार्फत प्रकरणात चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

---

**सोलापुर येथे बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान थांबविण्याबाबत**

**(२९) ५८२१२ (२२-०८-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापुर येथे बेदाणा उत्पादक किमान निर्मिती खर्च मिळावा अशी अपेक्षा करीत असतांनाच दुसऱ्या बाजूला प्रत्येक बॉक्समधून २ ते ३ किलो बेदाणा व्यापाऱ्यांकडून काढला जातो त्यामुळे १५ किलोच्या बॉक्समध्ये शेतकऱ्यांना ३ किलोची तूट सहन करावी लागत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांची ही लुट थांबविण्यासाठी बाजार समितीने कठोर उपाययोजना करावी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०३-२०१७) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाने अपंगांच्या नोक-यांमधील अनुशेष भरुन काढण्याबाबत**

**(३०) ५९२६९ (२०-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने अपंगांच्या नोक-यांमधील अनुशेष भरुन काढण्यासाठी विशेष भरती मोहिम राबवण्याचा संकल्प केला. परंतु अद्यापही २ हजार ७७६ जागांचा अनुशेष शिल्लक असल्याचे माहे एप्रिल,२०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील अनुशेष भरुन काढण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-०२-२०१७) :**(१) व (२) अपंग अधिनियम, १९९५ ची राज्यात सन १९९६ पासून जशीच्या तशी अंमलबजावणी करण्यात येत असून, सदर अधिनियमातील तरतुदीनुसार शासकीय सेवेत अपंगाकरीता एकूण ३ टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. त्यानुसार राज्य शासनामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

या विभागाकडून अपंग अधिनियम, १९९५ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीविषयक केवळ समन्वयाचे कामकाज हाताळण्यात येते. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल असलेल्या रिट याचिका क्र. ३२९४/२०१०-निलिमा अनंत सुर्वे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने शासन सेवेतील अपंगांचा अनुशेषबाबत मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभागांकडून (डिसेंबर, २०१० पर्यंतची) माहिती संकलीत करुन मा. उच्च न्यायालयास सादर करण्यात आली व त्यानंतरही सदर माहिती संकलीत करुन वेळोवेळी मा.उच्च न्यायालयात सादर करण्यात येत आहे. त्यानुसार दि. ३०.१२.२०१५ पर्यंतची विविध प्रशासकीय विभागांकडून

उपलब्ध माहितीनुसार राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयांमध्ये अदाजे २५७३ पदांचा अनुशेष शिल्लक असल्याचे दिसून आले.

अपंगांचा अनुशेष भरुन काढणेसाठी यापूर्वी विशेष भरती मोहिम राबविणेबाबत दि. ८.८.२०११ रोजी शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे. सदर शासन परिपत्रकातील सूचना दिनांक २३.७.२०१५ च्या अर्ध शासकीय पत्रान्वये पुनश्चः सर्व विभागांना सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन सेवेतील अपंगांच्या अनुशेषाची पदे तातडीने भरण्यासंदर्भात प्रधान सचिव (सा.न्या.) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३०.१२.२०१५ रोजी मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभागांची बैठक आयोजित करण्यात येऊन विशेष भरती मोहिम राबवून अपंगांचा अनुशेष तातडीने भरण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे दि. ३०.१२.२०१६ व ४.०१.२०१७ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये अपंगांचा अनुशेष तातडीने भरण्याबाबत सुचित करण्यात आले असून अपंगांच्या रीक्त पदाची अद्यावत माहिती पाठविण्याबाबत सर्व विभागांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरोळ तालुक्यात (जि. कोल्हापूर) संजय गांधी निराधार योजनेसह अन्य योजनांची कमिटी नसल्याबाबत**

**(३१) ५९३१७ (२०-०८-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ तालुक्यात (जि. कोल्हापूर) संजय गांधी निराधार योजनेसह अन्य योजनांची कमिटी नसल्याने कार्यालयीन कामकाज ठप्प होऊन लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ मिळत नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२७-०१-२०१७) :**(१) नाही.

(२), (३) व (४) शिरोळ (जि. कोल्हापूर) तालुक्यात संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती गठीत झाली नाही. परंतु, ज्या तालुक्यात अशी समिती गठीत झाली नसेल त्या तालुक्यात अर्जदारांचे अर्ज प्रलंबित राहू नयेत, यासाठी संबंधित तहसिलदार यांना लाभार्थी निवडीचे व लाभार्थ्यांना लाभ मंजुर करण्याचे अधिकार दि. ५ मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रदान केले आहेत. त्यानुसार तहसिलदार शिरोळ यांनी सदर समितीची बैठक घेवून सर्व प्राप्त अर्ज निकाली काढलेले आहेत. संजय गांधी निराधार योजनेची समिती गठीत झाली नसली तरी याबाबतचे नियमित कामकाज चालू आहे. त्याचप्रमाणे सदर समितीवरील अध्यक्ष व अशासकीय सदस्य यांच्या शिफारशी करण्याबाबत मा.पालकमंत्री महोदयांना विनंती करण्यात आली आहे.

---

## राज्यात क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले मागासवर्गीय वसतिगृहांच्या धर्तीवर इतर मागासर्वीयांसाठी वसतिगृहे स्थापन करणेबाबत

**(३२) ५९३२४ (२०-०८-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले मागासर्वीय वसतिगृहांच्या धर्तीवर ओबीसी महिलांसाठी स्वंतत्र अशी वसतीगृहे राज्यात उपलब्ध नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर मागासवर्गीय महिलांना स्वंतत्र वसतीगृहे निर्माण करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील विविध भागातून तसेच शिक्षण व नोकरी व्यवसाय करणाऱ्या महिला/मुलींना स्वतंत्र असे वसतीगृह उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०२-०३-२०१७) :**(१) व (२) होय.

(३) शासन निर्णय दिनांक ७/०१/२०१६ अन्वये राज्यात नोकरी करणा-या मागासवर्गीय महिलांसाठी मुंबई, पुणे व नागपूर या तीन शहरांमध्ये वसतीगृहे सुरु करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये इतर मागास महिलांचाही समावेश करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी आवश्यक असलेल्या ११५ नवीन पदांना शासनाने दिलेली मंजूरी

**(३३) ५९४८९ (२०-०८-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय आणि विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रामणपत्र देण्यासाठी आवश्यक असलेल्या ११५ नवीन पदांना राज्य मंत्रीमंडळाने दिनांक १७ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास मंजूरी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हानिहाय स्वतंत्र जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या सुरु करण्यात आल्या आहेत काय,

(३) असल्यास, बाब १ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी सुरु करण्यास होणा-या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, जिल्हा समितीचे कामकाज तातडीने सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे ,नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-०२-२०१७) :** (१) व (२) होय.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इचलकरंजी (जि. कोल्हापूर) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना व इंदिरा गांधी वृध्दपकाळ योजनेतील लाभार्थ्यांना पेंशन मिळाली नसल्याबाबत**

**(३४) ५९७२६ (२०-०८-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी ( जि. कोल्हापूर ) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना व इंदिरा गांधी वृध्दापकाळ योजनेतील लाभार्थ्यांना गेल्या चार महिन्यापासून पेंशन मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या लाभार्थ्यांना पेंशन न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या योजनेतील लाभार्थ्यांना तातडीने पेंशन देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२७-०१-२०१७) :** (१) नाही.

इचलकरंजी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील सदर योजनेतील सर्व लाभार्थ्यांचे माहे ऑक्टोबर २०१६ अखेरचे अनुदान त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई व पुण्याच्या किरकोळ बाजारामध्ये टोमॅटो ८० रुपये प्रति किलो भावाने विकाला जात असल्याबाबत**

**(३५) ६००५६ (२२-०८-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्रातील बगायती पट्यात पाण्याअभावी केलेली लागवड दुष्काळामुळे शेतक-यांना काढून टाकावी लागल्याने तसेच मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये आवक कमी होऊन उत्पादन घटल्यामुळे मुंबई व पुण्याच्या किरकोळ बाजारामध्ये १५ ते २० रुपये किलोने मिळणारा टोमॅटो माहे जून, २०१६ मध्ये वा पहिल्या आठवड्यात ८० रुपये प्रति किलो भावाने विकला जात होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार सदर दुष्काळी गावात शेतक-यांसाठी शासनाच्या मदतीच्या योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०३-२०१७)** :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यात संजय गांधी निराधार समित्या गठीत करण्याबाबत

**(३६) ६१३१५ (२०-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील संजय गांधी निराधार समिती स्थापन करण्याबाबत उर्वरित तालुक्यातील समित्या गठण करण्यासंदर्भात कार्यवाही चालू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यात संजय गांधी निराधार समित्या गठीत करण्यात आल्या आहेत काय,
(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२७-०१-२०१७)** :(१) होय.
(२) नाही.
(३) सोलापूर जिल्ह्यात एकूण १३ संजय गांधी निराधार अनुदान योजना समित्या आहेत. त्यांपैकी ४ समित्यासंदर्भात मा.पालकमंत्री महोदयांकडून शिफारशी प्राप्त झाल्या आहेत. उर्वरीत समित्या गठीत करण्याच्या अनुषंगाने मा.पालकमंत्री महोदयांकडून शिफारशी प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## शेतक-यांना सावकारी कर्जातून मुक्ती देण्यासाठी शासनाने कर्जमाफीची घोषणा केल्याबाबत

**(३७) ६२४५० (२२-०८-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यात परवानाधारक सावकारांकडून सतत व्यवसाय क्षेत्रा बाहेर नियमबाह्य कर्ज वाटप करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ अनुषंगाने गतवर्षी २०१५-२०१६ मध्ये १७१ कोटी रुपयाची शासनाने सावकारी कर्ज माफी केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सावकारी कर्ज माफी देताना शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज सावकारी कार्यक्षेत्रा बाहेरील असल्याने शेतकऱ्यांना कर्ज मुक्ती नाकारण्यात आली, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, कार्यक्षेत्राबाहेर अवैध कर्ज वाटप करणाऱ्या सावकारांवर कलम ४१ नुसार शासनाने कोणती कारवाई केली,
(५) असल्यास, अवैध सावकारांना अभय देणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच उक्त शेतकऱ्यांना कर्ज मुक्ती देण्यासाठी शासन काय कारवाई करणार आहे?

**श्री. सुभाष देशमुख (०२-०३-२०१७) :** (१) होय, अंशतः खरे आहे,

(२) मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांनी परवानाधारक सावकारांकडून घेतलेल्या कर्जास माफी देणेबाबत शासन निर्णय एमएलए १०१५/प्र.क्र.२५/७-स, दिनांक १०.०४.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आला. सदर शासन निर्णयात अंदाजे रु. १७१.३० कोटी कर्जमाफीची आर्थिक तरतुद करण्यात आलेली होती. शासन निर्णयातील तरतुदीनुसार अकोला जिल्ह्यात ४९ शेतक-यांना रु.३.९६ लाख रकमेचा लाभ देण्यात आला आहे.

(३) शासन निर्णय एमएलए १०१५/प्र.क्र.२५/७-स, दिनांक १०.०४.२०१५ अन्वये अटी व शर्थीची पुर्तता करणा-या कर्जबाजारी शेतक-यांना सावकारी कर्जमाफी योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

(४) अकोला जिल्ह्यात महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ च्या कलम ४१ चे उल्लंघन केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील रमाई आवास योजनेच्या कामाबाबत

**(३८) ६२४९० (२९-०८-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिका क्षेत्रात रमाई आवास योजनेंतर्गत सन २०१५-१६ करीता ७०० घरकुलांचे उदिष्ट देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उदिष्टानुसार किती घरकुलांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-०२-२०१७) :**(१) होय.

(२) सदर उद्दिष्टानुसार ६६८ घरकुलांच्या दुस-या टप्प्याची बांधकामे पूर्ण करण्यात आली असून, ३२ घरकुलांचे बांधकाम प्रगती पथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुण्याच्या समाजकल्याण आयुक्तालयाच्या मुख्याध्यापक ठोकवेतन पदभरतीमध्ये गैरप्रकार झाल्याबाबत

**(३९) ६२८४१ (२०-०८-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्याच्या समाजकल्याण आयुक्तालयाने जुलै, २०१२ मध्ये मुख्याध्यापक ठोकवेतन भरती प्रक्रिया राबविली असून या पदभरतीमध्ये गैरप्रकार झाल्याच्या तक्रारीवरून आयुक्तांना याबाबत तातडीने अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते, हे खरे आहे,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाचा अहवाल सादर करण्यास आयुक्त दुर्लक्ष करीत असून अद्यापही अहवाल शासनास दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अहवाल सादर न करण्याची कारणे काय,

(४) असल्यास, अहवाल शासनास सादर करण्यास विलंब करणाऱ्या आयुक्तांविरुध्द शासन कोणती कारवाई केली वा करणार आहे,

(५) तसेच सदर पद भरती प्रक्रियेबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०२-२०१७) :**(१) होय.

(२) नाही. आयुक्तालयाचे पत्र क्र. २२८९ दिनांक १९/८/२०१६ अन्वये सविस्तर अहवाल शासनास सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात टोमॅटोंचा दर नियंत्रणात आणण्याबाबत**

**(४०) ६३९३६ (१०-०८-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात टोमॅटोंच्या उत्पन्नात झालेली घट व परराज्यात टोमॅटोंना मोठ्या प्रमाणावर मागणी यामुळे किरकोळ बाजारात टोमॅटोंना ८० ते १०० रुपये किलोचा दर ग्राहकांना मोजावा लागत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेऊन टोमॅटोंचा दर नियंत्रणात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (०२-०३-२०१७) :** (१) व (२) मान्सूनचे उशीरा आगमन व सदोष बियाणे यामुळे टोमॅटोच्या उत्पादनात घट झालेली होती. त्यामुळे बाजारात आवक कमी झाल्याने टोमॅटोचे दर वाढलेले होते. तथापि, ज्या भागात टोमॅटोचे उत्पादन चांगले झाले होते, अशा भागातून इतरत्र भाजीपाला व टोमॅटो पाठविण्याची व्यवस्था FPO (Farmer Producers Organization) च्या माध्यमातून केल्याने बाजारात पुरवठा सुरळीत होण्यास मदत झाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) शहरातील संजय गांधी निराधार अनुदान योजना, इंदिरा गांधी वृध्दापकाळ व श्रावणबाळ इत्यादी योजनांचे धनादेश लाभार्थ्यांना वाटप करण्याबाबत**

**(४१) ६४५९० (१९-०८-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरातील संजय गांधी निराधार अनुदान योजना, इंदिरा गांधी वृध्दापकाळ व श्रावणबाळ इत्यादी योजनांचे धनादेश लाभार्थ्यांना तातडीने वाटप करण्यासाठी

माजी विधानसभा सदस्य यांनी मा.उपविभागीय अधिकारी, मालेगांव, नाशिक यांना दिनांक २२ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांना धनादेशाचे वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१०-०३-२०१७) :** (१) सदरहू निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) मालेगाव शहरमधील सर्व पात्र लाभार्थ्यांचे माहे ऑक्टोबर, २०१६ पर्यंतचे अनुदान वाटप करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील २०१५-१६ या आर्थिक वर्षात, सुमारे १७,३१५ सहकारी संस्थांनी लेखापरिक्षण (ऑडिट रिपोर्ट) अहवाल जिल्हा उपनिबंधकास सादर न केल्याबाबत

**(४२) ६५४६१ (१७-१२-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील २०१५-१६ या आर्थिक वर्षात, सुमारे १७,३१५ सहकारी संस्थांनी लेखापरिक्षण (ऑडिट रिपोर्ट) अहवाल जिल्हा उप निबंधकास सादर केला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई शहर व उपनगरात एकूण किती गृहनिर्माण, नागरी बँका, पतपेढया, कर्मचारी पतपेढया, औद्यागिक संस्था, ग्राहक संस्था, मजूर संस्था अस्तित्वात आहेत, व यापैकी किती संस्थांनी, माहे नोव्हेंबर, २०१६ अखरेपर्यंत लेखापरिक्षण अहवाल सादर केले आहेत,
(३) असल्यास, लेखापरिक्षण अहवाल सादर न करणा-या संस्थांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) मुंबई शहर व उपनगरात सर्व प्रकाराच्या एकूण ३००३३ सहकारी संस्था असून त्यापैकी माहे डिसेंबर, २०१६ अखेर पर्यंत एकूण २२३५० संस्थांनी लेखापरिक्षण अहवाल सादर केलेले आहेत.
(३) व (४) ज्या लेखापरिक्षकांनी लेखापरिक्षण अहवाल सादर केलेले नाहीत, त्या लेखापरिक्षकांचे नांव राज्याच्या नामतालिकेवरुन कमी करणेबाबत सहकार आयुक्त, पुणे यांनी दि. ०४.१०.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सर्व क्षेत्रीय अधिका-यांना कळविले आहे. तसेच ज्या सहकारी संस्थांनी अधिनियमातील तरतुदी नुसार लेखापरिक्षकाची नेमणूक, मागील वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षकाचा अहवाल इत्यादी बाबींचे अनुपालन केलेले नाही त्यांचेविरुध्द कारवाई

करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरिक्षक यांना सहकार आयुक्त, पुणे यांनी दि.२९.१०.२०१६ रोजी निर्देश दिलेले असून, पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

## सुरजगड (जि.गडचिरोली) टेकडीतील लोहखनिज उत्खननाकरीता केलेल्या कराराची चौकशी होणेबाबत

**(४३) ६५६५८ (१७-०१-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील सुरजगड टेकडीत हजारो कोटी रूपयाचे लोहखनिज आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरजगड टेकडीतील लोहखनिजांवर उद्योग उभारण्याकरीता खाजगी कंपनीला ३८ कोटी रूपये २० वर्षासाठी कराराने देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर टेकडी परिसरातील नागरीकांनी या उद्योगामध्ये भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध होणेकरीता शासनाकडे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सुरजगड लोहखनिज भाडेपट्ट्यावर कंपनीला देताना पेसा व वनहक्क कायदा नियमांचे उल्लंघन झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर कंपनीचे कंत्राट रद्द करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१६-०२-२०१७) :** (१) व (२) मे. लॉईड मेटल्स व इंडस्ट्रीज या खाजगी कंपनीस खाण व खनिजे (विकसन व विनियम) अधिनियम, १९५७ मधील तरतुदीनुसार लोहखनिज या खनिजाकरिता ३४८.०९ हेक्टर क्षेत्राकरिता दिनांक १३.०४.२००७ च्या आदेशान्वये खनिपट्टा मंजूर करण्यात आला आहे.

(३) जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांच्याकडे सदरील परिसरातील भुमीपुत्रांना प्रस्तुत खाणीमध्ये रोजगार देण्याची विनंती केली आहे. त्या बाबत स्थानिक प्रशासनाकडून चर्चा करून समाधान करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रस्तुत घटकाने पेसा व वनहक्क कायद्यांचे उल्लंघन केल्याबाबत कोणताही अहवाल आजतागायत खनिकर्म विभागास प्राप्त झालेला नाही. त्यामुळे खनिपट्टा रद्द करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## संजय गांधी,इंदिरा गांधी व श्रावण बाळ योजनेअंतर्गत निराधारांना देण्यात येणाऱ्या अनुदानामध्ये वाढ करणेबाबत

**(४४) ६६२७६ (१०-०१-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून संजय गांधी, इंदिरा गांधी व श्रावण बाळ योजनेअंतर्गत निराधरांना प्रति महिना ६०० रु.अनुदान दिले जाते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याच्या काळातील महागाई,राज्यात पडत असलेला दुष्काळ इत्यादिं कारणामुळे या लाभधारकांना उपजिविकेसाठी प्रति महिना ६०० रुपये कमी पडत असल्याने वाढवून देण्याबाबत परांडा-भूम-वाशीयेथील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१०-०३-२०१७) :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) सदरहू योजनेच्या लाभार्थ्यांच्या मासिक अनुदानात वाढ करण्याच्या प्रस्तावावर विचाराविनमिय सुरु आहे.

---

**मौजे हिरडगांव (ता.श्रीगोंदा,जि.अहमदनगर) येथील "साईकृपा" साखर कारखान्यात सन २०१४-२०१५ वर्षात ऊस गाळप केलेल्या ऊसाचे पैसे शेतकऱ्यांना मिळाले नसल्याबाबत**

**(४५) ६६३७७ (१७-१२-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे हिरडगाव (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) या साखर कारखान्यात सन २०१४-२०१५ या वर्षात ऊसाचे गाळप करुन ऊसाचे पैसे माहे सप्टेंबर,२०१६ पर्यंत मिळाले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर कारखाना व्यवस्थापनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२५-०१-२०१७) :**(१) होय.
हंगाम २०१४-१५ मध्ये कारखाना दि. २५/११/२०१४ रोजी सुरु होऊन दिनांक २१/०४/२०१५ रोजी बंद झाला. कारखान्याने ५६०५५१ मे.ट. ऊसाचे गाळप केले असून कारखान्याची हंगाम २०१४-१५ करीता कारखान्याची एफ.आर.पी. रु.२२००/-प्र.मे.ट. होती. त्यामधून ऊसतोडणी व वाहतुक खर्च रु.५७८/-प्र.मे.ट. जाता निव्वळ देय एफ.आर.पी. रु.१६२२/-इतकी राहते. देय एफ.आर.पी. नुसार माहे सप्टेंबर २०१६ अखेर कारखान्याने देय रक्कम रु.९०९२.१४ लाखापैकी रु.६८१३.६७ लाख अदा केले असून रु.२२७८.४७ लाख कारखान्याकडे थकीत आहेत.

(२) व (३) सदर प्रकरणी वेळोवेळी सुनावण्या घेवून थकीत एफ.आर.पी.अदा करणेबाबत सूचना देण्यात आल्या. तथापि दि.३१/०७/२०१५ अखेरच्या ऊसदर देयबाकी अहवालानुसार कारखान्याने देय रु.९०९२.१४ लाखापैकी केवळ रु.५२६७.०४ लाख अदा केले व रु.३८२५.१० लाख थकित ठेवल्याने ऊस नियंत्रण आदेश १९६६ मधील तरतुदीनुसार दिनांक १२/०८/२०१६ रोजी कारखान्यावर रु. ३८२५.१० लाख रुपयांचे आर.आर.सी. आदेश पारीत करुन जिल्हाधिकारी अहमदनगर यांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी प्राधिकृत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सहकारी संस्थाच्या निवडणूका निवडणूक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली होत असल्याबाबत

**(४६) ६६५५८ (१७-१२-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सहकारी संस्थाच्या निवडणूका गेल्या दोन वर्षापासून निवडणूक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली घेतल्या जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला जिल्हयातील सहकारी संस्थांच्या निवडणूकांच्या निधीचा हिशोब सादर केला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या निवडणुकीच्या निधीत प्रचंड अपहार असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(५) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०४-०३-२०१७) :**(१) होय.
(२) नाही. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या स्थापनेनंतर अकोला जिल्हयात महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम ४ अन्वये ६४९ निवडणूक पात्र संस्थांपैकी ५६९ संस्थांच्या निवडणूका पूर्ण झाल्या आहेत. त्यापैकी ४१० संस्थांचे हिशोब पूर्ण झाले असून उर्वरित संस्थांचे हिशोब त्वरीत देण्याबाबत जिल्हा उपनिबंधक, अकोला यांनी दि.३.१०.२०१६ च्या पत्रान्वये खुलासा मागविला आहे. त्यानुसार संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सुचित करुन खुलासा मागविला आहे. त्यानुसार संबंधित निवडणुक अधिकारी यांनी अपूर्ण हिशोब खर्च पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे कळविले आहे.
(३) नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या तीन शाखांमध्ये सुमारे तीन कोटी ४६ लाख रूपयांची वसूली झाली नसल्याबाबत**

**(४७) ६६६७२ (१७-१०-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या तीन शाखातून सुमारे तीन कोटी ४६ लाख रूपयांची वसूली झालेली नसल्याचे अहवालात माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात आणखी कोणत्या बाबी नमूद करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, या अहवालानुसार संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१७) :** (१) जिल्हा बँकेच्या ८ शाखांमध्ये अपहार/अफरातफरीमध्ये रू.३४६.५५ लाख गुंतले आहेत. त्यांची अद्याप वसूली झालेली नाही.

(२) सन २०१६-१७ मध्ये दि.३०/९/२०१६ अखेर अफरातफरीची २ प्रकरणे निदर्शनास आली असून त्यामधील गुंतलेली रक्कम रू.१२.२० लाख वसूल झाली आहे.

(३) बँकेतील ८ शाखांमध्ये घडलेल्या अपहार प्रकरणी १६ अधिकारी/कर्मचारी यांना बँकेच्या सेवेतून चौकशी अंती बडतर्फ करण्यात आले आहे. तसेच सदर अपहार प्रकरणी प्रत्यक्ष अपहार करणारे अधिकारी/कर्मचारी यांचेविरूध्द विशेष लेखा परिक्षक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर यांनी संबंधित पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल केले आहेत. सदर अपहार रकमा व्याजासह वसुलीसाठी मे.सहकार न्यायालय, कोल्हापूर येथे ८ अधिकारी/कर्मचारी यांचेविरूध्द दावे दाखल करण्यात आले आहेत. तसेच शाखा कागल नं.२ अपहार प्रकरणी मा.न्यायालयाने गुन्हेगार कर्मचाऱ्यांच्या स्थावर मालमत्ता तबदिल करु नयेत म्हणून हुकूम केला असून तो संबंधित ग्रामसेवक/तलाठी/ सहाय्यक निबंधक, कागल यांना लागू केले आहेत. बँकेच्या शाखा कागल नं.२ व शाखा गोकुळ शिरगांव येथील अपहाराबाबत त्यातील रक्कम वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत चौकशी पूर्ण होऊन कागल शाखा नं.२ मधील अपहारातील रक्कम रु.२८७.०० लाख व गोकुळ शिरगाव शाखेतील अपहाराची रक्कम रु.७९.७३ लाख तसेच दोन्ही रकमेवरील एकूण रक्कम पूर्ण भरेपर्यंत द.सा.द.शे.१८% व्याज दराने होणारे आर्थिक नुकसानीच्या परतफेडीची वैयक्तिक व सामुदायिक जबाबदारी बँकेच्या २८ अधिकारी व कर्मचारी यांच्यावर निश्चित करण्यात आली. त्यापैकी २३ अधिकारी/कर्मचाऱ्यांनी शासनाकडे अपील दाखल केले. सदर अपीलातील १२ कर्मचाऱ्यांना दोषमुक्त केले असून ९ कर्मचाऱ्यांना जबाबदार धरले आहे. अद्याप २ अपीलांचा निकाल प्रलंबित आहे. जबाबदार धरलेल्या कर्मचाऱ्यांकडून रकमेची व्याजासह वसूली करणेसाठी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था कोल्हापूर यांचेकडून सदर व्यक्तींच्या विरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९८ ब अन्वये वसूलीचे प्रमाणपत्र मिळणेची कार्यवाही बँकेमार्फत सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात प्रत्येक जिल्ह्यात खनिज प्राधिकरण स्थापन करण्याबाबत**

**(४८) ६६६८८ (१६-१२-२०१६). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रत्येक जिल्ह्यात खनिज प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट,२०१६ मध्ये वा दुसऱ्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१६-०२-२०१७) :**(१) व (२) केंद्रीय खाण मंत्रालयाने खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७ मध्ये केलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने दिनांक १०.०८.२०१६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये राज्यातील ३५ जिल्ह्यांमध्ये (मुंबई शहर जिल्हा वगळून) खाण बाधित क्षेत्र व समुदायाचा विकास करण्यासाठी जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने शासन अधिसुचना दिनांक ०१.०९.२०१६ अन्वये जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या स्थापनेबाबतचे नियम, रचना व कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोर (जि.पुणे) तालुक्यातील हातवे बु. येथील विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीच्या गैरव्यवहारांबाबत**

**(४९) ६७४३३ (१७-१२-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील हातवे बु. येथील विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीच्या आजी व माजी सचिवांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करणेसाठी संस्थेच्या संचालक मंडळांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी अनुक्रमे १३.०९.२०१६ व ३०.०९.२०१६ रोजी वा त्या सुमारास सहायक निबंधक, सहकारी संस्था, भोर व जिल्हा निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचेकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीत दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाइ केली वा करत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१७) :**(१) होय.

(२) सदर संस्थेबाबत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भोर यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ (अ) अन्वये तपासणीबाबतचे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (ग्रामीण) या कार्यालयाने दिनांक २७/१०/२०१६ रोजी आदेश दिलेले आहेत. सदर तपासणीचे कामकाज सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यामध्ये खरीप हंगाम सन २०१६-१७ मध्ये उत्पादीत होणाऱ्या खरीप शेतमालाची आधारभूत किंमत ठरवणेसाठी खरेदी केंद्रे सुरु करणेबाबत**

**(५०) ६७५६९ (१६-१२-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये खरीप हंगाम सन २०१६-१७ मध्ये उत्पादीत होणारा खरीप शेतमाल खरेदी करणेसाठी आधारभूत किंमत खरेदी केंद्रे सुरु करावी असा अध्यादेश राज्य कृषी व पणन मंडळाने बाजार समित्यांना दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील बाजार समित्यांकडून या अध्यादेशाची आत्तापर्यंत कोणतीही अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील बाजार समितीत ठिकठिकाणी आधारभूत किंमत खरेदी केंद्रे तात्काळ सुरु करण्याकरीता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-०१-२०१७) :**(१), (२) व (३) केंद्रशासनाने निश्चित केलेल्या किमान आधारभूत किंमत योजनेची अंमलबजावणी राज्यात नाफेडच्या वतीने महाराष्ट्र राज्य पणन महासंघामार्फत केली जाते.

कोल्हापूर जिल्ह्यात मूग, तूर व उडीदाचा पीकपेरा अत्यंत कमी व उत्पन्न मर्यादित असल्याने सदर शेतमालाची खरेदी केंद्र सुरु केलेली नाहीत. तथापि, सोयाबीनसाठी कोल्हापूर, गडहिंग्लज व वडगांव येथे आधारभूत किंमत खरेदी सुरु केलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन**
**मुंबई**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.